**कृपया प्रसिध्दीसाठी -** **15 डिसेंबर 2013**

## दादासाहेब फाळके चित्रनगरी, बोरीचा पाडा वीजेने प्रकाशित

**मुंबई, रविवार** : ''देशाची आर्थिक राजधानी मुंबई आणि त्यातही दादासाहेब फाळके चित्रनगरीतील आदिवासींचा बोरीचा पाडा येथे वीज नसणे म्हणजे दिव्याखाली अंधार! स्वातंत्र्यानंतर 66 वर्षे होऊन गेल्यावर आता त्यांना वीजेच्या जोडण्या मिळाल्यामुळे आदिवासींच्या जीवनात ख-या अर्थाने प्रकाश पडला आहे'', असे उद्गार भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी शनिवारी सायंकाळी वीज जोडणीचे उद्घाटन करताना काढले.

दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये पिढ्यानपिढ्या रहाणारी अनेक आदिवासी कुटुंबे आहेत. मुख्य रस्त्यापासून दूर आणि उंच टेकडीवर रस्ता नसल्यामुळे चार आदिवासी कुटुंबांना वीजेची जोडणी मंजूर होत नव्हती. चित्रनगरी आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने केलेली उपेक्षा याला कारणीभूत होती. श्री. राम नाईक यांच्या मार्गदर्शनामुळे आणि भाजपाचे कार्यकर्ते श्री. सुभाष उपाध्याय आणि आदिवासी वस्तीत रहाणारे श्री. मोहन गोरात यांच्या संयुक्त पाठपुराव्यामुळे अखेर वीज मिळाली. सर्व अडथळे दूर करुन मिळालेल्या विजेचे श्री. राम नाईक यांनी जेव्हा बटण दाबून उद्घाटन केले तेव्हा आदिवासी कुटुंबातील म्हाता-या - कोता-यांपासून ते लहानमुलांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांची ही भावना लक्षात घेऊन भाजपाचे मुंबई उत्तर पश्चिम जिल्ह्याचे उपाध्यक्ष श्री. चंदनसिंह परमार यांनी आदिवासींना दूरदर्शनचा संच देण्याचे जाहीर केले. त्याचप्रमाणे आठवड्यातून एक संध्याकाळ या पाड्यामध्ये येऊन लहान मुलांसाठी संस्कार वर्ग चालविण्याची जबाबदारी ॲड. कमलेश यादव आणि श्री. राजकिरण साळवे यांनी घेतली. या छोट्याशा कार्यक्रमाला भाजपा उत्तर पश्चिम जिल्ह्याचे सरचिटणीस श्री. संतोष मेढेकर, श्री. दुर्गादास भक्ता, श्री. आनंद माने, श्री. सुनील मिस्कींन, श्री. जितेंद्र पाटील, श्री. विजय गरुडे, आदी कार्यकर्तेही उपस्थित होते.

**(कार्यालय सचिव)**